दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■
•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १७३ •सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये
• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


आज घटस्थापना




## नवरात्र उत्सव
### पहिली माळ



*आश्विन शुद्ध पक्षीं अंबा बैसलि सिंहासनीं हो ।*
*प्रतिपदेपासुनी घटस्थापना ती करुनि हो ।*
*मूलमंत्रजप करुनि भोंवते रक्षक ठेवूनी हो ।*
*ब्रह्माविष्णु रुद्रआईचें पूजन करिती हो ।। १ ।।*
*उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो ।*
*उदोकारें गर्जती काय महिमा वर्ण तिचा हो ।*
*उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो ।। ध्रु.।।*
*। उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो ।*




# जिल्ह्याची मान खाली घालणाऱ्यांना थाराही द्यायचा नाही

# जिल्ह्याचे नाव खराब करणाऱ्यांना मंत्री पंकजा मुंडे यांचा ईशारा



**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यापासून विविध घटनांमुळे बीड जिल्ह्याचे नाव राज्यभरात चर्चेत राहिले होते. लोकसभा निवडणुकी पासून याला सुरुवात झाली. आरक्षणाच्या मुद्द्यावरूनही जिल्ह्यात अनेक घटना झाल्या.पुढे जिल्ह्यात गुन्हेगारीच अनेक उदाहरण पाहायला मिळाले. यामुळे जिल्ह्याची बदनामी झाल्याचे दिसून आले होते. आता मंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्ह्याच्या परिस्थितीवर भाष्य केले आहे रविवारी नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पंधरवड्याच्या कार्यक्रमात पंकजा मुंडे बोलत होत्या. नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा च्या कार्यक्रमानिमित्त बीडमध्ये मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये मंत्री पंकजा मुंडे यांनी बोलत असताना त्यांच्या पालकमंत्री काळातल्या कामाचा पाढा वाचून दाखवला. मी पालकमंत्री असताना जलसंधारण आणि मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेची काम झाल्याचे त्या म्हणाल्या. येणाऱ्या पाच वर्षांमध्ये या जिल्ह्याचे नाव मोठ करायचे असून या जिल्ह्याची मान खाली घालणाऱ्याला थाराही द्यायचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## ई–पीक पाहणीस ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ : विविध लाभासाठी तात्काळ ई पीक पाहणी करा – जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



**बीड । प्रतिनिधी**

खरीप हंगामातील ई–पीक पाहणी नोंदणी करण्यासाठी राज्य सरकारने अंतिम मुदत वाढवून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे . या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना वेळेत नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे . जिल्हा प्रशासनाची भूमिका : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की , शेतकऱ्यांना सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळवायचा असल्यास ई–पीक पाहणी अत्यंत महत्त्वाची आहे . उशीर करू नका , तातडीने ऍपवर नोंदणी करा. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही संबंधित महसूल व कृषी ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'मी खात्यावर पैसे घेत नाही, ड्रायव्हरच्या UPI वर पाठवा', व्हायरल कॉल रेकॉर्डिंगवर लक्ष्मण हाकेंचा खुलासा

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी आंदोलक लक्ष्मण हयांची एक ऑडिओ क्लिप सध्या व्हायरल होत आहे. यामध्ये एका तरुणाने हाके यांना त्यांच्या सामाजिक कार्यात योगदान म्हणून म्हणून पैसे देऊ केले. मात्र, लक्ष्मण हाके त्याला म्हणाले, मी अकलुजला आल्यावर द्या किंवा पुण्यातही ▶ उर्वरित पान २ वर




### • माझं आंदोलन बदनाम करू नका : लक्ष्मण हाके

ओबीसी आंदोलक हाके म्हणाले, मला बदनाम करण्याचे अनेक प्रयत्न झाले आहेत. परंतु, मला कितीही बदनाम केलं तरी माझी चळवळ थांबणार नाही. मी जे प्रश्न उपस्थित करतोय ते चालूच राहील. माझं आंदोलनही चालू राहील. माझ्या आंदोलनाला बदनाम करण्याचे प्रयत्न होत आहेत. मात्र, मला या लोकांना एवढंच सांगायचं आहे की मला बदनाम करायचं असेल तर करा, त्याचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही. माझं आंदोलन बदनाम करायचा प्रयत्न करू नका.

## भुजबळांच्या उपस्थितीत बीड येथे होणाऱ्या महाएल्गार मेळावा नियोजनासाठी
### आज ओबीसी कार्यकर्त्यांची गेवराईत बैठक

**तलवाडा । प्रतिनिधी**

अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सकल ओबीसी समाजाचे नेते मा.ना.छगनरावजी भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ठिक चार वाजता बारा बलुतेदार व आठरा आलुतेदार प्रवर्गातील तमाम ओबीसी समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी महाएल्गार



मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी महात्मा फुले विद्यालय, भगवान नगर गेवराई याठिकाणी आज सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी ठिक दहा वाजता ओबीसी समाजाचे प्रमुख कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आज गेवराई येथील महात्मा फुले विद्यालयात होणाऱ्या बैठकीस ओबीसी – भटके विमुक्त ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव तालुक्यातील 13 वर्षीय मुलगा बेपत्ता
### पालकांची पोलिसांकडे धाव, अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**



माजलगाव तालुक्यातील मालीपारगाव येथील १३ वर्षी मुलगा रोहीत विजय चव्हाण हा मागील दोन दिवसांपासून बेपत्ता झाला आहे. याप्रकरणी त्याचे वडील विज बाबुराव चव्हाण यांनी केज पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. रोहितच्या अचानक बेपत्ता होण्याने परिसरात खळबळ उडाली आहे. फिर्यादीत दिलेल्या माहिती नुसार, रोहीत हा रामराव पाटील माधमिक विद्यालय, ▶ उर्वरित पान २ वर

## मराठवाड्यात शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरूच
### आठ महिन्यात ७०७ शेतकऱ्यांनी मरणाला कवटाळले
#### • सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यात, मागील वर्षी ९४८ शेतकऱ्यांनी केल्या आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

कर्जबाजारी, नापिकी, दुष्काळ, अतिरि पाऊस, शेतीमालाला नसणारा योग्य भाव यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेदिवस वाढू लागल्या. राज्यात सर्वाधिक आत्महत्या मराठवाड्यात होत आहेत. गेल्या आठ महिन्याच्या कार्यकाळात मराठवाड्यातील ७०७ शेतकऱ्यांनी मरणाला कवटाळले. सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यातील आहेत. वाढत्या आत्महत्या पाहता चिंता व्यक्त केली जावू लागली. सध्या पडत असलेल्या पावसामुळे मराठवाड्यातील शेती उध्दवस्त झाली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मदत मिळाली नाही तर मराठवाड्यात आणखी आत्महत्या



वाढण्याची भिती व्यक्त केली जावू लागली. गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या होत आहेत. शेतकरी आत्महत्या होण्या मागची वेगवेगळी कारणेआहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रेम प्रकरणातून तरूणाची आत्महत्या
### तिघा जणाविरोधात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

प्रेम प्रकरणावरून एका तरूणाने आत्महत्या केल्याचा प्रकार आष्टी तालुक्यातील सराटे वडगाव येथे घडला. या प्रकरणी तिघा जणाविरोधात आष्टी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपक गणपत कापरे (वय २६ रा.सराटी वडगाव ता.आष्टी) या तरूणाने नांदेड येथील एका तरूणीसोबत प्रेम संबंध होते. या प्रेम प्रकरणावरून दिपक कापरे याने आत्महत्या



केली. या प्रकरणी मोहन भागुजी कापरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी संजय सुर्यवाड, नागेश पेटके व सदरील तरूणी विरोधात आष्टी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मंत्री पंकजाताई मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी भेट

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी रविवारी (दि.२१) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान क्षीरसागर कुटुंबीयांच्यावतीने पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजप



जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी नगराध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर, संपादक दिलीप खिस्ती, डॉ. सारिकाताई क्षीरसागर, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, डीसीसी बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, चंपावती शिक्षण संस्थेचे चंद्रकांत मुळे, सलीम जहांगीर, भाजप अल्पसंख्याक नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, राष्ट्रवादी कॉंग्रेस विद्यार्थी ▶▶ उर्वरित पान २ वर

## त्र्यंबकेश्वर येथील पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध
### मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुक्याच्या वतीने पोलीस स्टेशनला दिले निवेदन



**वडवणी । प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वर नाशिक येथील पत्रकार योगेश खरे पत्रकार किरण ताजने.पत्रकार अभिजीत सोनवणे सह इतर पत्रकारांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर तसेच डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या सूचनेवरून ▶▶ उर्वरित पान २ वर

## रविवारी बीड येथे होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यास लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे : सत्संग मुंडे

**• माजलगाव येथे ॲड. सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी समाजाची बैठक संपन्न**



**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करून मराठा समाजासाठी ओबीसीकरणाचा मार्ग खुला करून दिला आहे. यामुळे ओबीसी प्रवर्गावर मोठा अन्याय होत असून राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात देशाचे ओबीसी नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांनी रणसिंग फुंकले आहे. काही झाले तरी ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही यासाठी ना. भुजबळ यांनी लढा उभारला आहे. त्याचाच एक भाग म्हणून बीड येथे रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि ओबीसी समाजातील मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाचा महाएल्गार मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यास जिल्ह्यातील ओबीसी बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश ▶▶ उर्वरित पान २ वर



# घटस्थापना कशी करावी ? पहा शास्त्रोक्त पद्धतीने कशाप्रकारे बसवावा देवीचा घट...!

नवरात्रोत्सव २२ सप्टेंबर पासून सुरु होत आहे. नवरात्रीत नऊ दिवस देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. हा उत्सव आदिशक्ती नवदुर्गाला समर्पित असतो. नवरात्रीचे व्रत आणि पूजा करून देवीची नवरात्र साजरी केली जाते. नवरात्रीत घटस्थापना करण्याची देखील पद्धत आहे. ही घटस्थापना नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी केली जाते. त्यामुळे पाहुयात शास्त्रोक्त पद्धतीने देवीचे घट कसे बसवावेत.

## घटस्थापनेची पद्धत

नवरात्र म्हंटले की देवीची घटस्थापना करण्यात येते. नवरात्रोत्सव हा देवी दुर्गाच्या नावरूपानं समर्पित असतो. या नऊ दिवसांच्या काळात देवीची विधिवत पूजा आणि व्रत केले जातात. तसेच नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी घटस्थापना केली जाते. घटस्थापनेच्या विधीचे नवरात्रात विशेष महत्व आहे. अनेकजण आपल्या घरात आपल्या कुलदेवीचे घट बसवतात. प्रत्येकाची पद्धत आणि परंपरा ही वेगळी



असली तरी घटस्थापनेची शास्त्रोक्त पूजाविधी ही जवळपास सारखीच असते. यंदा नवरात्री २२ सप्टेंबर पासून सुरु होत आहे. त्यामुळे नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी घटस्थापना देखील करण्यात येईल. अनेकांना घटस्थापनेची योग्य पद्धत माहित नसते. त्यामुळे आज आपण पाहुयात यंदा नवरात्रीत घटस्थापना कशी व कोणत्या मुहूर्तावर करावी.

## घटस्थापना पूजा साहित्य

घटस्थापनेच्या पूजेत फार कमी साहित्य लागते. प्रत्येकजण आपल्या पद्धतीनुसार हे साहित्य कमी जास्त करू शकते. सर्वात प्रथम म्हणजे ज्यामध्ये घट बसवायचे आहेत त्यासाठी परडी आणावी. काहीजण मातीच्या भांड्यात घट बसवतात त्यांनी मातीचे भांडे किंवा कलश आणावा. विड्याची पाने, लाल धागा, सात प्रकारचे धान्य, तांदूळ, सुपारी, विडा, पाच फळे, नारळ, तांब्याचा कलश, चौरंग, लाल वस्त्र, फुले, हार, दिवा, अगरबत्ती, धूप, रांगोळी

## घटस्थापनेची पद्धत

चौरंगावर नवीन लाल वस्त्र अंथरावे. त्यावर विड्याची पाने ठेवून आपले देव मांडावे. मग बाजूला परातीत तांदूळ ठेवून त्यावर तांब्याचा कलश ठेवावा. कलशात एक नाणे टाकून त्यावर विड्याच्या पानांमध्ये नारळ ठेवावा. कलशाला हळदकुंकू लावावे. त्यानंतर घटस्थापनेसाठी परडीत माती घ्यावी मातीत सात प्रकारची धान्य पेरावीत त्यावर मातीचा कलश ठेवावं कलशात पाणी घालावे त्यात नाणे टाकावे तांदूळ घालावे मग त्यावर विड्याची पाने लावून त्यात नारळ ठेवावा. नारळाला हळदीकुंकू लावावे. कलशाला लाल धागा बांधावा. लाल धाग्याला विड्याची नऊ पाने लावून माळ तयार करावी व ती घटाला पहिल्या दिवशी बांधावी. हा घट देवी समोर बसवावा. त्यानंतर देवीला हार फुले अर्पण करुन धूप, दीप, अगरबत्ती लावून पूजा करावी. नैवेद्य दाखवून शेवटी देवीची आरती करावी.

## घटस्थापनेचा शुभ मुहूर्त

सोमवार २२ सप्टेंबर २०२५

सकाळी : ६.०९ वाजेपासून ते सकाळी ८.०६ वाजेपर्यंत

अभिजित मुहूर्त : सकाळी ११.४९ वाजेपासून ते दुपारी १२.३८ वाजेपर्यंत

याकाळात तुम्ही घटस्थापना करू शकता.

◆ पान १ वरून पुढे...

## जिल्ह्याची मान...

नाही असा इशारा त्यांनी यावेळी दिला. मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटनानंतर माध्यमांशी संवाद साधताना बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर प्रशासनाकडून आढावा घेऊन उद्या कॅबिनेट बैठकीत याची माहिती देणार असल्याचे त्यांनी सांगितले. सरकारची मानसिकता शेतकऱ्यांच्या मागे राहण्याची आहे. पुढे बोलतांना ओबीसी मराठा संघर्ष आहे मात्र ज्या पद्धतीने तो मांडला जात आहे मी तसे चष्मे लावून फिरत नाही म्हणून त्या पद्धतीने मला पाहायला मिळत नाही. मी एखाद्या माणसाकडे बघत असताना जातीचा रंग पाहत नाही.. त्यामुळे कदाचित तसे मला दिसत नसावा असे मुंडे म्हणाल्या. अनेक समाज वेगवेगळ्या ठिकाणी आरक्षण मागत आहेत. तिथला समाज विरोध करतो हे नैसर्गिक असून जसे त्यांचे मागणे नैसर्गिक तसा विरोधही नैसर्गिक आहे. यातून मार्ग काढणे हे । नेत्याचे कर्तव्य आहे. आत्ताच्या राज्यकर्त्यांनी राजा सारखे मन ठेवून सर्वांच्या हिताचा निर्णय घेतला पाहिजेसामाजिक दृष्ट्या मागास असलेल्या लोकांना कुठेही धक्का न लागता. हा निर्णय घ्यावा. यावेळी येऊ घातलेल्या दसरा मेळाव्याबाबत बोलत असताना दरवेळी दसरा मेळावा विशेषच असतो, गावागावात तयारी पूर्ण झाली असून लोकांच्या मनात उत्साह आहे. ती परंपरा असून स्वाभिमानाची निशाणी आहे या मेळाव्यात कुठलाही हेतू नाही, तीन दशकांपासून दसरा मेळावा सुरू असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

## ई-पीक पाहणीस...

विभागाच्या अधिकाऱ्यांना उद्देशून म्हटले की , गाव पातळीवर शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचावी . सर्व ग्राममहसूल अधिकारी , मंडळ अधिकारी व सहायक कृषी अधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून ई-पाहणी पूर्ण व्हावी . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी शेतकऱ्यांना आवाहन करताना स्पष्ट केले की , मुदतवाढ ही शेवटची संधी समजून शेतकऱ्यांनी वेळेत फोटोसह पीक पाहणी पूर्ण करावी . अन्यथा अनुदान , विमा व योजना लाभांपासून वंचित राहण्याचा धोका संभवतो. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सांगितले की , अनेक शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी करता आली नाही . मात्र शासनाने दिलेल्या मुदतवाढीचा फायदा सर्वांनी घ्यावा . मंडळ अधिकारी व ग्राममहसूल यांनी गावात जाऊन प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की – ई-पीक पाहणीसाठी मोबाईल ऍप वापरावे . शेतजमिनीचा स्पष्ट फोटो , योग्य लोकेशन आणि खरीप हंगामातील प्रमुख पिकाची निवड अचूक नोंदवावी . एकदा नोंदणी पूर्ण झाली की त्याची पुष्टी ( ऍकनॉलेजमेंट ) जतन करून ठेवावी . शेतकऱ्यांना आवश्यक असल्यास महसूल मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याकडून मदत घ्यावी . शेतकऱ्यांना प्रशासनाचे आवाहन : प्रशासनाच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात अद्याप काही टक्के क्षेत्राची ई – पीक पाहणी बाकी आहे . त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने ३० सप्टेंबरपूर्वी नोंदणी करून आपले हक्क सुरक्षित करावेत , असे प्रशासनाचे स्पष्ट आवाहन आहे .

## 'मी खात्यावर...

तुम्ही मला भेटू शकता. कारण मी पुण्यातच राहतो. यावर तरुणाने यूपीआयद्वारे पैसे देतो असं सांगितल्यानंतर हाके यांनी त्यांच्या ड्रायव्हरचा यूपीआय लिंक्ड मोबाईल नंबर दिला. तसेच ते म्हणाले, मी बँक खात्यावर पैस घेत नाही. मुळात माझ्याकडे बँक खातं नाही. मी यूपीआय वापरत नाही. लक्ष्मण हाके तरुणाला म्हणाले, मी दिलेल्या यूपीआय नंबरवर तुम्ही पैसे पाठवू शकता. कारण हा आपल्या मित्राचाच नंबर आहे. किती पैसे पाठवताय? यावर तरुणाने लक्ष्मण हाके यांना शिवीगाळ केली आणि सामाजिक कार्याच्या नावाखाली पैसे घेताना लाज कशी वाटत नाही?' असा प्रश्न उपस्थित केला. या कॉलचं रेकॉर्डिंग सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. यावर आता हाके यांनी खुलासा केला आहे. लक्ष्मण हाकेंकडून खुलासा– लक्ष्मण हाके यांनी काही वेळापूर्वी एबीपी माझाशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, मला त्या कॉल रेकॉर्डिंगबाबत खुलासा विचारण्याऐवजी ज्यने मला फोन केला होता त्याला जाब विचारला पाहिजे. तुम्ही त्या इसमाला विचारा की लक्ष्मण हाके यांना बदनाम करण्याचा तुमचा हेतू आहे का? मी काही पैसे मागायला फोन केला नव्हता. त्यामुळे माझ्या हेतूविषयी शंका घेण्याऐवजी पैसे देऊ करणाऱ्याचा हेतू काय होता ते तपासा. लक्ष्मण हाकेला बदनाम करणं हाच त्याचा हेतू होता का?

## भुजबळांच्या उपस्थितीत...

समाजातील सर्व कार्यकर्ते व ओबीसी समाज बांधव यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. या बैठकीला माजी आ.नारायणराव मुंढे, महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस – ॲड.सुभाषभाऊ राऊत, सत्संग मुंढे, जे.डी. शहा, प्रा.पी.टी.चव्हाण, रासपचे परमेश्वर महाराज वाघमोडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी आज आयोजित केलेल्या बैठकीला गेवराई तालुक्यातील सर्व ओबीसी कार्यकर्ते – पदाधिकारी तसेच ओबीसी समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल ओबीसी – भटके विमुक्त समाजाच्या वतीने ओबीसी समन्वयक सुघोष मुंढे सर व महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे.

## माजलगाव तालुक्यातील...

केज येथे इयत्ता सातवीत शिकत असून मागील वर्षापासून गंगाधर मल्हारी नेहरकर यांच्या तांबवेश्वर गुरुकुल होस्टेलमध्ये राहत होता. काही दिवसांपूर्वी तो होस्टेलमधून पळून गेला होता आणि घरी परतला होता. मात्र, पुन्हा निमित शिक्षणासाठी त्याला १८ सप्टेंबर रोजी आई-वडिलांनी तुळजापूर देवीचे दर्शन करून परतताना सायंकाळी साडेचारच्या सुमारास होस्टेलमध्ये सोडले. सायंकाळी साधारण साडेसहा वाजता रोहीत होस्टेलमधून निघून गेला असल्याची माहिती होस्टेलचे प्रमुख गंगाधर नेहरकर यांनी मुलाचे वडील विज चव्हाण यांना दूरध्वनीवरून दिली. त्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने मुलाचा शोध घेतला. शेजारी, नातेवाईक, पाहुणे अशा ठिकाणी चौकशी केली; मात्र रोहित कुठेच सापडला नाही. रोहित विजय चव्हाण याचे वय १३ वर्षे असून तो रंगाने सावळा, अंगाने सडपातळ, केस काळे सरळ व बारीक, नाक सरळ आणि दात पुढे आलेले आहेत. उंची अंदाजे ३ फूट ८ इंच आहे. तो शेवटचा दिसला तेव्हा अंगावर पांढऱ्या व काळ्या रंगाचा मोठ्या चेक्स असलेला शर्ट आणि निळ्या रंगाची जीन्स पँट घातलेली होती. त्याला कोणीही बघितले किंवा तो कुठेही आढळून आल्यास त्वरित ९३२५४१९९३० या मोबाईल क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, मुलाला कोणी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी पळवून नेले असावे. त्यामुळे अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज पोलीस ठाण्याचे पथक या मुलाचा शोध घेण्याचा प्रयत्न करत असून परिसरात तपास सुरू आहे. विजय चव्हाण हे शेतमजुरी करून संसार भागवतात. त्यांना रोहीत आणि रोहन अशी दोन मुले आहेत. रोहित अचानक बेपत्ता झाल्याने स संपूर्ण कुटुंबावर दु:ख कोसळले आहे. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घ्यावी, अशी विनंती पालकांकडून

## मराठवाड्यात शेतकरी...

कधी अतिरि पाऊस पडतो तर कधी पाऊसच पडत नाही. त्यातच शेतीमालाला बाजारात चांगला भाव मिळत नाही, कर्जबाजारी आणि नापिकीला कंटाळून देखिल अनेक शेतकरी नैराश्येत जावून आपले जीवन संपवितात. जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्याच्या कार्यकाळात मराठवाड्यातील ७०७ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १२८ शेतकरी, जालना ४९, बीड १७२, लातुर ५५, हिंगोली ४३, परभणी ७१, नांदेड १०४ आणि धाराशिव जिल्ह्यातील ८५ शेतकऱ्यांनी मरणाला कवटाळले. १०७ प्रकरणापैकी ९३ प्रकरणे मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आले. ४६३ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरविण्यात आले. सर्वाधिक आत्महत्याच्या घटना बीड जिल्ह्यामध्ये घडल्या. गतवर्षी २०२४ साली ९४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. दरम्यान वाढत्या आत्महत्या पाहता चिंता व्ये केली जावू लागली. ऑगस्ट, सप्टेंबर या महिन्यामध्ये मराठवाड्यात पावसाने धुमाकूळ घातला. या पावसाने मराठवाड्यातील १६ लाख हेक्टरपेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झाले. राज्य सरकारने शेतकऱ्यांना योग्य आर्थिक मदत केली नाही तर मराठवाड्यात आणखी शेतकरी आत्महत्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## मंत्री पंकजाताई...

आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे यांच्यासह भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## त्र्यंबकेश्वर येथील...

मराठी पत्रकार परिषद शाखा वडवणी. डिजिटल मीडिया वडवणी तालुका तसेच हल्ला विरोधी कृती समिती यांच्या वतीने वडवणी पोलीस स्टेशन येथे निवेदन देऊन हल्लेखोरांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी मराठी पत्रकार परिषद वडवणी तालुक्याच्या वतीने करण्यात आली यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे वडवणी तालुका अध्यक्ष सतीश सोनवणे ज्येष्ठ पत्रकार सुधाकर पोटभरे. डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष ओमप्रकाश साबळे. संपादक ज्ञानेश्वर लंगे.पत्रकार महेश सदरे पत्रकार धम्मपाल डावरे पत्रकार वाजेद पठाण पत्रकार गीतांजली लव्हाळे पत्रकार संभाजी लांडे पत्रकार राम चौरे पत्रकार हर्षद उंडाळकर, पत्रकार अतुल जाधव सह अदी पत्रकार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## रविवारी बीड ...

सरचिटणीस सत्संग मुंडे यांनी केले आहे. माजलगाव येथे दि. २१ सप्टेंबर २०२५ रोजी महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व तयारी संदर्भात समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांची बैठक संपन्न झाली. यावेळी सत्संग मुंडे बोलत होते. या बैठकीस भाजपा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सरवदे, नाभिक समाजाचे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे, परीट समाजाचे तालुकाध्यक्ष जगन्नाथ शिंदे, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, माजलगाव पंचायत समितीचे माजी सभापती दिनेश गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवप्रसाद खेत्रे, संजीवनीताई राऊत, रूपमानंद खेत्रे बळीराम यादव संतोष रासवे जगन्नाथ खेत्री, ओबीसी महासंगाचे तालुका अध्यक्ष शामसुंदर आमर गिरी पाचाळ ज्ञानेश्वर कोरडे, बाबासाहेब आडाव, शिवाजी आढाव किशोर पाचाळ महादेव नाना आढाव शंकर गावडे कुंडलीक आढाव रामेश्वर आढाव आनंत आढाव सचिन रासवे मछिंद्र आढाव भरत आढाव बाबु आढाव भाऊ कबळे अशोक आढाव सतिश यमगर नारायण आढाव मयूर पाचाळ आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना सत्संग मुंडे पुढे म्हणाले की, रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड येथे ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचा भव्य महाएल्गार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला असून यामुळे ओबीसी समाजामध्ये कमलीची भीती आणि सरकार विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## ओला दुष्काळ...

झालेली आहे. मुख्य नदी व उप नद्यांना पुर येवून शेतकरी बांधवांच्या जमिनी खरडुन गेल्या आहेत. शेतामध्ये पुराचे पाणी शिरून पिक व फळबागाचे नुकसान झाले आहे. दीर्घकाळ पाणी जमिनीवर राहिल्याने पिकांचे नुकसान होऊन घरांची पडझड झाली आहे. सार्वजनिक मालमत्ता रस्ते व पुल खरडुन जाणे, शाळा व शासकीय इमारतीचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, पशुधन मृत्युमुखी पडणे, विजेच्या तारा तुटणे, खांब मोडणे, रोहित्र खराब होणे व त्यामध्ये जिवीतहानी होणे, बंधारे फुटल्यामुळे शेती वाहुन जाणे, तलाव फुटण्याची शक्यता असणे व कपिलधार ता.बीड, भानकवाडी (वरची) ता.शिरूर का. याठिकाणी भुस्खलन होणे या सर्व बाबींची सकारात्मक दृष्टीकोनातून नुकसानीचे सर्वेक्षण व वस्तुनिष्ठ पंचनामा करावा. शेतकरी बांधव, नागरिक यांना सरसकट नुकसान भरपाई देवून मदत करावी. तसेच मागील तीन महिन्यापासून होत असलेल्या पावसामुळे सर्वत्र जमीन, नदी, नाले, बंधारे, तलाव पाणीमय झालेले आहेत. त्यामध्ये सर्व पिकांचे व फळ बागांचे शतप्रतिशत नुकसान झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यासर्व बाबींचे निकष पाहता तथा आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार शेतकरी बांधव, ग्रामस्थ व नागरिकांना सर्वरित्या सक्षम साथ व सहकार्य होणेसाठी ओला दुष्काळ जाहिर करून सर्वोतोपरी मदतीची गरज आहे. त्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्राद्वारे केली आहे.

## गेवराई बाजार...

राजकारणात बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती पदाला महत्वाचे स्थान आहे. अमरसिंह पंडित यांनी सभापती पदासाठी मुजीब पठाण यांच्या माध्यमातून मुस्लिम चेहरा आणि उपसभापती पदासाठी विकास सानप हा ओबीसी चेहरा देऊन सामाजिक समतोल राखण्याचा प्रयत्न केला होता. मागील वेळी अतिशय चुरशीच्या निवडीमध्ये अडीच-अडीच वर्षांचे आश्वासन त्यावेळी देण्यात आले होते, म्हणून आता हे राजीनामे झाल्याची चर्चा गेवराई तालुक्यात आहे. राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सभापती आणि उपसभापती पदाच्या निवड प्रक्रियेकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. आ.विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून कोणते सामाजिक समीकरण आखणार आहेत ? असा प्रश्न राजकीय जाणकारांना पडला आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदासाठी अनेकांनी आपला दावा केला असून या पदासाठी मागील अनेक दिवसांपासून मोर्चे बांधणी सुरू आहे. आज होणाऱ्या सभापती आणि उपसभापती पदाच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर या दोन्ही पदांच्या आजच्या निवडीला महत्त्व आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अशोक नाईकवाडे, पांडुरंग मुळे, जगन्नाथ काळे, राम लाल धस, हनुमान कोकणे, महारुद्र चाळक, बाबासाहेब जाधव, रमेश साखरे, अशोक खरात, रमेश खोपडे, मंगेश कांबळे, दिलीपकुमार जैन, राम चाळक, कृष्णा राऊत, सौ.वैशाली जाधव, श्रीमती लक्ष्मीबाई पवार यांचा विद्यमान संचालक मंडळात समावेश आहे. यांपैकी दोहोंची सभापती आणि उपसभापती पदावर वर्णी लागण्याची शक्यता आहे. सभापती आणि उपसभापती यांचे राजीनामे मंजुर झाल्यानंतर गेवराई तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ.विजयसिंह पंडित कोणते सामाजिक समीकरण या माध्यमातून करणार आहेत ? याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर...

तालुक्यातील अनेक गावातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांची भेट घेऊन अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीवर चर्चा केली. तसेच शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्याचा आग्रह केला. यासंदर्भात शेतकऱ्यांच्या प्रमुख पाच मागण्यांचे निवेदन घेऊन आज सोमवारी मयंक गांधी हे परळीच्या तहसीलदारांना भेटणार आहेत. कुठलीही जात – पात, धर्म, राजकीय पक्षाची भूमिका न घेता सर्वांनी फक्त शेतकरी म्हणून एकत्र राहण्याचे त्यांनी सर्वांना आवाहन केलेलं आहे. मी शेतकरी आणि शेतकरी प्रथम एवढीच या सर्व आंदोलनाची दिशा असेल, शेतकरी म्हणून सर्वांनी उद्या उपस्थित रहावे असे सांगण्यात आले आहे. झालेल्या नुकसानीचे बांधावर जाऊन वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत द्यावी, वाहून गेलेले रस्ते, पूल दुरुस्त करावेत, तुटलेल्या विजेच्या तारा आणि खांब दुरुस्त करावे आणि माती वाहून गेलेल्या जमिनीला शासनाने जरी मदत दिली तर त्याची नोंद पोटखराब क्षेत्र म्हणून ७/१२ वर घेण्यात येऊ नये अशा मागण्या शासनाकडे करण्यात येणार आहेत. तालुक्यातील पीडित शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## कऱ्हेवडगाव जि. प...

व त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शाळेमध्ये राष्ट्रीय सण व इतर सणानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत. खाडे मॅडम यांनी ११ वर्ष एकाच ठिकाणी ज्ञानदानाचे पवित्र कार्य केल्याने व विद्यार्थ्यांवर जिवापाड प्रेम केल्याने निरोप देताना विद्यार्थ्यांचा कंठ दाटून आले व मॅडम सह विद्यार्थी रडू लागले. हे सर्व पाहून उपस्थित नागरिकांच्या डोळ्यांमध्ये अश्रू दाटून आले. यावेळी मा. सरपंच केशव बांगर मा. सरपंच जालिंदर गायकवाड, कांतीलाल सांगळे, प्रविण गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना जुन्या आठवणींना उजाळा दिला. नवनियुक्त मुख्याध्यापक राजेंद्र पवार यांनी यापूर्वी या शाळेत १५ शिक्षक म्हणून ज्ञानदान केलेले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी कऱ्हेवडगावचे विद्यमान सरपंच परिवंत गायकवाड होते. यावेळी मा. सरपंच केशव बांगर, मा. सरपंच जालिंदर गायकवाड, समिती अध्यक्ष गणेश टकले, उपाध्यक्ष महेश सांगळे पत्रकार संतोष नागरगोजे, आत्माराम नागरगोजे मुकादम, मा. उपसरपंच श्रीधर खांडवे, कांतीलाल सांगळे, अशोक नागरगोजे, अमर शेख, सलवार शेख, डॉ. किशोर बांगर, प्रविण गायकवाड, राम नागरगोजे प्रशांत बांगर ,गहिनीनाथ नागरगोजे, गोकुळ खाडे, शंकर नागरगोजे, काकासाहेब खांडवे, अंकुश नागरगोजे, विष्णू नागरगोजे, जालिंदर नागरगोजे, उद्धव खांडवे, बाळासाहेब खांडवे, गोवर्धन गावडे, साखरबाई नागरगोजे, अश्विनी नागरगोजे आदी सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते मुख्याध्यापक बापू जायभाय, सहशिक्षक सरोदे सर सहशिक्षिका रंजना खाडे यांनी विद्यार्थ्यांना भेट म्हणून स्टिल पाणी बॉटल दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र पवार यांनी तर सूत्रसंचालन पत्रकार संतोष नागरगोजे यांनी केले.

## क्रीडांगण हे...

विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांकडे अतिशय गांभीर्याने पाहिले पाहिजे असा मौलिक सल्लाही विद्यार्थ्यांना सतिष राठोड यांनी दिला. या स्पर्धेत न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शालेय पातळीवर सातत्याने सराव करणाऱ्या श्रृष्टी नितिन पाटील , श्रावणी केंद्रे , प्रितम फड आणि काव्या देशमुख या चार विद्यार्थिनींनी आपले क्रीडा कौशल्य दाखवत जिल्हास्तरीय निवड स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. त्यांच्या या यशामुळे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल परिवारात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक व क्रीडा प्रशिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी दाखवलेली मेहनत, क्रीडांगणावर उमटवलेली झुंज आणि पालकांचा उत्साह यामुळे संपूर्ण स्पर्धा रंगतदार झाली. या प्रसंगी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळचे सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी , संचालक वसंत चव्हाण, प्राचार्य डॉ बी आय खडकभावी तसेच प्राचार्य एम. प्रशांतकुमार यांनी उपस्थित राहुन यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेमुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये कुस्तीबद्दलची आवड, क्रीडाप्रेम आणि स्पर्धात्मक वृत्ती अधिक दृढ झाली असून भावी पिढीला सक्षम खेळाडू घडविण्यास नक्कीच प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ ● पान ४

# ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्या : आ.संदीप क्षीरसागर



## मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, कृषिमंत्र्यांना दिले पत्र

बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टीमुळे पावसामुळे शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई देण्यात मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. बीड विधानसभा क्षेत्रासह (बीड व शिरूर का. तालुका) जिल्हा व महाराष्ट्रामध्ये गत तीन महिन्यापासून मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत आहे. गत ऑगस्ट महिन्यात व दि.१३ सप्टेंबर २०२५ पासून सातत्याने अतिवृष्टी पाऊस होत आहे. या पावसामुळे सर्वच पिके व फळबागांचे शतप्रतिशत नुकसान झाले आहे. महसुल, कृषी विभाग तथा तत्सम विभागाला सरसकट शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करून पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत. अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार, महसूलमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री ना.दत्तामामा भरणे, राज्याचे मा.मुख्य सचिव, मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर आणि बीड चे जिल्हाधिकारी यांच्याकडे आ.संदीप क्षीरसागर यांनी पत्राद्वारे केली आहे. यामध्ये बीड विधानसभा क्षेत्रातील बीड व शिरूर का. तालुक्यात सर्वच महसुल मंडळात अतिवृष्टीची नोंद

▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई बाजार समितीच्या सभापती व उपसभापतींची आज निवड

## माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण आणि उपसभापती विकास सानप यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिल्यामुळे रिक्त झालेल्या सभापती व उपसभापती पदाची निवड आज होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक दिपक पवळ काम पाहणार आहेत. यामुळे गेवराईमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून सभापती आणि उपसभापती पदासाठी इच्छुकांनी मोर्चे बांधणी सुरु केल्याचे दिसून येत आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखालील गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कोणाची वर्णी लागणार आणि अमरसिंह पंडित कोणता निर्णय घेणार आहेत याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठवाड्यातील आग्रगण्य




बाजार समिती म्हणून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली या बाजार समितीने मोठा नावलौकिक मिळविला आहे. सुमारे अडीच वर्षांपूर्वी बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणुक झाली. निवडणुकीत अमरसिंह पंडित यांच्या गटाचे सर्व उमेदवार बहुमताने निवडून आले. बाजार समितीचे १८ संचालक अमरसिंह पंडित यांच्या गटाचे असल्यामुळे एकहाती सत्ता त्यांच्या गटाकडे आहे. गेवराई तालुक्याच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्हा विकास परिषद महिला ब्रिगेड प्रमुख सौ.मनिषा शितोळे यांची निवड

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा विकास परिषदेची बैठक संभाजीनगर येथीइल स्वामी रामानंद तिर्थ सभागृहात झाली. यावेळी प्रत्येक जिल्ह्यात महिला ब्रिगेड स्थापन करण्याचा निर्णय झाला. यानुसार बीड येथील मनिषा शितोळे यांची बीड जिल्हा महिला ब्रिगेड म्हणून एक मताने निवड झाली. अध्यक्ष डॉ.व्यंकटेश काब्दे यांनी राजीनामा दिल्यामुळे नवे अध्यक्ष प्राचार्य सोमनाथ रोडे यांची निवड झाली. यावेळी माजी आमदार डी.के.देशमुख, बीड



जिल्हा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र आगवान, सुमंत गायकवाड सह आठही जिल्ह्याचे अध्यक्ष होते. सौ.मनिषा शितोळे या मराठवाडा विभागातील पहिल्या महिला ब्रिगेड निवडल्या आहेत.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर जलनायक मयंक गांधी यांच्या शासनाकडे पाच प्रमुख मागण्या

## लोकाग्रहास्तव आज तहसीलदारांना भेटणार ; शेकडो शेतकरी सोबत असणार

परळी वै. । प्रतिनिधी

मागील काही दिवसांत अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. फक्त पिकांचेच नुकसान नाही झाले तर नद्या, नाले, ओढे यांना पूर आल्यामुळे शेतजमिनीचेही नुकसान झाले आहे. कोणाच्या शेतातील सुपीक माती वाहून गेली, तर कोणाच्या शेतात दगडगोटे येऊन त्याचा खच पडला आहे. कोणाची जनावरे दगावली आहेत तर कोणाच्या शेतातील विहिरी बुजल्या, शेती उपयोगी साहित्य



वाहून गेले. या सर्व परिस्थितीत शासन आणि प्रशासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असणे गरजेचे आहे. मात्र ऐन दसरा - दिवाळीच्या तोंडावर शेतकरी संकटात असतानाही मदत प्रक्रियेत दिरंगाई केली जात आहे. अनेक गावांतील शेतकऱ्यांनी जलनायक मयंक गांधी यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या मांडल्या. प्रमुख पाच समस्यांचे निवेदन घेऊन ते आज सोमवारी तहसीलदार, परळी यांची भेट घेणार असून, शेकडो शेतकऱ्यांना सोबत घेऊन प्रशासनाशी शांततेच्या मार्गाने चर्चा करणार आहेत. परळी वैजनाथ

▶▶ उर्वरित पान २ वर

# अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पाठपुराव्याला यश

**● उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.चंद्रकांत पाटील यांच्या आश्वासनानंतर संशोधक विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे**

बीड । प्रतिनिधी

संशोधक विद्यार्थी समन्वय कृती समितीच्या मागण्यांबाबत मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करु, असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज दिले. संशोधक विद्यार्थी समन्वय कृती समितीच्या शिष्टमंडळाने आज ना. पाटील



यांची भेट घेऊन चर्चा केली. अभाविप च्या पाठपुराव्यानंतर व ना. पाटील यांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय समन्वय समितीने घेतला. तसेच, कृषीच्या विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून मंत्रालयात मुख्य सचिवांसोबत बैठक घेऊन मार्ग काढण्याबाबत चर्चा करण्यात आली.

# कऱ्हेवडगाव जि. प.प्रा.शाळेतील सर्वच शिक्षकांच्या वदल्या, निरोप देताना विद्यार्थी भावुक

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील कऱ्हेवडगाव येथील जि. प. प्रा. शाळेतील मुख्याध्यापक बापूराव जायभाय सहशिक्षक सरोदे सर, सहशिक्षिका रंजना खाडे या सर्वांच्या बदल्या झाल्या. त्यांना निरोप व नव्याने रुजू झालेले मुख्याध्यापक राजेंद्र पवार, सहशिक्षिका जाधव मॅडम, सहशिक्षक वाघमारे सर यांचा सत्कार समारंभ सोहळा शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांकडून शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता.




यावेळी बदली झालेल्या शिक्षकांचा फेटा, शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक बापु जायभाय, सहशिक्षक सरोदे सर सहशिक्षिका रंजना खाडे यांनी शाळेमध्ये अध्यापनाचे उत्कृष्ठ कार्य करत शाळेला कुटुंब समजून विद्यार्थ्यांवर जीवापाड प्रेम केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड:- अशोक टल्ले यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना सतीश बहीर, समवेत शिवाजी पाटोळे, विठ्ठल काळे, दत्तात्रय राहींज, अशोक शेंदाडे आदि.*

# क्रीडांगण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे उत्तम साधन- क्रीडा अधिकारी सतिष राठोड

## तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या चार विद्यार्थिनींची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

कुठलेही क्रीडांगण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे उत्तम साधन असल्याचे मत तालुका क्रीडा अधिकारी सतिष राठोड यांनी व्यक्त केले . ते मोदी लर्निंग सेंटर येथील न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई येथे तालुकास्तरीय कब्बडी स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला होता. नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत परिसरातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांनी आपल्या कुस्ती कौशल्याचा उत्तम प्रत्यय या स्पर्धेत दाखवून दिला.


स्पर्धेचे उद्घाटन अंबाजोगाई तालुका क्रीडा अधिकारी सतीश राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की क्रीडांगण हे व्यक्तिमत्व घडवण्याचे उत्तम साधन आहे. क्रीडांगण हे शाळेपेक्षा कमी महत्त्वाचे नसल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर परिश्रम, शिस्त आणि चिकाटी यामुळेच खरी क्रीडावृत्ती विकसित होत असून

▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### जरुड येथे आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**आज ह.भ.प शांतिब्रह्म नवनाथ महाराज यांचे कीर्तन**




बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील जरुड (ता. बीड) येथे सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत व विविध संत-महंतांच्या आशिर्वादाने आई नवसाई देवी नवरात्र कीर्तन महोत्सव सोमवारी (दि.२२ सप्टेंबर) उत्साहात सुरुवात होत आहे.हा महोत्सव मंगळवार दि. ३० सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. या कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन ह.भ.प. शांतीब्रह्म नवनाथ महाराज (गोरक्षनाथ टेकडी) व ह.भ.प. अखंडानंद गिरीजी महाराज (श्रीक्षेत्र भवानीगड) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला आहे. या महोत्सवात राज्यभरातील मान्यवर कीर्तनकार व संत सहभागी होत असून, भाविक भक्तांसाठी अध्यात्मिक मेजवानी उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमात ह.भ.प. स्वरमुर्ती रामेश्वर महाराज शास्त्री (लोणी शहाजनपूर), ह.भ.प. प्रतिभाताई गायकवाड, ह.भ.प. भागवताचार्य नवनाथ महाराज नाईकवाडे, ह.भ.प. युवाकीर्तनकार माऊली महाराज, ह.भ.प. बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते, ह.भ.प. सिताताई आवाड, ह.भ.प. भगवंत महाराज पुरी, ह.भ.प. गणेश महाराज लोंढे यांच्यासह अनेक मान्यवर कीर्तनकारांचे कीर्तन सेवा होणार आहे. तसेच या महोत्सवात विविध भजनी मंडळे, आराधी मंडळे व महिला बचत गट सहभागी होणार असून, कीर्तन-भजन-आराद्याचा अखंड जलसा रंगणार आहे. संघर्षयोध्दा मा. श्री. मनोज दादा जरांगे पाटील व अनेक मान्यवर संत-महंतांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या महोत्सवाचे आयोजन समस्त गावकरी मंडळींनी केले असून, गावातील तरुण, मंडळी व महिला बचत गट मोठ्या उत्साहाने तयारीत सहभागी झाले आहेत. या महोत्सवाच्या निमित्ताने भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, हजारो भाविक भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.या कीर्तन महोत्सवाचे आयोजन माऊली महाराज जरुडकर यांच्या नियोजनाखाली व गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागात करण्यात आले असून, त्यामुळे कार्यक्रमात भक्तिमय वातावरण अधिक उत्स्फूर्त झाले आहे.

### पत्रकार सोमनाथ मोटे यांना बंधुशोक, संतोष मोटे यांचे आल्पशा आजाराने दुख:द निधन



तलवाड़ा । प्रतिनिधी

गेवराई येथील आमचे सहकारी मित्र पत्रकार सोमनाथ मोटे यांचे मोठे बंधु गेवराई नगर परिषदेतील कर्मचारी संतोष वामनराव मोटे यांचे शनिवार दिनांक २० रोजी अल्पशा आजाराने दुख:द निधन झाले. कै संतोष मोटे यांनी जीवनात अतिशय संघर्ष केला त्यांना नगर परिषद कर्मचारी पदावर कार्यरत राहण्यासाठी सुप्रीम कोर्टाने आदेश दिला नंतर २०१६ नंतर ते रोजंदारीवर काम करत होते त्यानंतर २०२५ मध्ये त्यांना सेवेत सामावुन घेतले मात्र त्यांना खुपचं त्रास झाला त्याच दरम्यान त्यांना मधुमेह आजार झाला गेल्या काही दिवसांपासुन ते मधुमेहावर विविध ठिकाणी उपचार घेत होते परंतु त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली त्यांचे शनिवार दिनांक २० रोजी आजाराशी संघर्ष करत त्यांची प्राणज्योत मावळली त्यांच्यावर काल गेवराई शहरातील स्मशान भूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या प्रश्चात पत्नी, भाऊ, तीन पुतने, नातसुना एक बहिण असा परिवार आहे आमचे सहकारी मित्र पत्रकार सोमनाथ मोटे यांचे संतोष मोटे हे मोठे बंधु होते. दैनिक मराठवाडा पत्र परिवार मोटे परिवाराच्या दुःखात सहभागी आहे.

### नंदकिशोर सजगणे यांना वंधूशोक



माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील तेलगव खु. येथील माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक चे नंदकिशोर सजगणे यांचे लहाने बंधू गोविंद सजगणे हे हैदराबाद येथे इंजिअर म्हणून कार्यरत होते परंतू आपले कार्यलयीन काम आटोपुन १९ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजता त्यांचे रेल्वे मध्ये अपघाती निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी २० सप्टेंबर रोजा ७:३० वाजता तेलगाव खु.ठिकानी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले गोविंद हे गावात अत्यंत शांत संयमी म्हणून परिचित होते त्यांचे अवघे वयाच्या ३० व्या वर्षी अपघाती निधनाची वार्ता समजताच पंचक्रोशीतील नागरिकांनी व प्रतिष्ठित नागरिक यांनी यावेळी हळहळ व्यक्त केली त्यांच्या पच्यात आई,वडील,पत्नी,बहीण, दोन मुली असा परिवार असून ते बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सजगणे यांचे लहान बंधू होत.

### पिंपरगव्हाण येथे भव्य देवी भागवत कथा सोहळा

**कथा प्रवक्ते ह भ प बबन देवा जोशी महाराज**



बीड । प्रतिनिधी

शारदीय नवरात्र उत्सवानिम्मित पिंपरगव्हाण येथे दिनांक २४/२/२५ बुधवार, अश्विन शु ३ पासून भव्य दिव्य देवी भागवत कथा प्रारंभ होणार. असून या नवरात्रीमध्ये देवीचा जागर व देवी महात्म्य , देवीची आराधन व दररोज सकाळी व सायंकाळी मान्यवरच्या हस्ते आरती करण्यात येणार आहे,असे कथा आयोजक आई तुळजा भवानी आराधी मंडळ व समस्त गावकरी पिंपरगव्हाण यांनी कळवले आहे . या देवी भागवत कथेला तबलासाथ विकास महाराज जयभये, शिंथ वादन व गायन सुग्रीव महाराज डाके यांची आहे. दिनांक ३०/९/२५ मंगळवारी ११ ते२ या वेळेत ह भ प अक्षय महाराज पिंगळे यांच्या सुमधुर काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार असून दुपारी ५ते ८देवीचा भव्य पालखी सोहळा मिरवणूक काढण्यात येणार आहे. देवी भागवत कथा सांगता महाप्रसाद होईल. या देवी भागवत कथा श्रावणाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा.

### तब्बल सहा दिवस धामणगाव अंधारात ; महावितरणच्या निष्क्रिय कारभारावर संताप

आष्टी । प्रतिनिधी

धामणगाव परिसरात आलेल्या महापुरानंतर तब्बल सहा दिवसांपासून गाव अंधारात आहे. गावात वीजपुरवठा खंडीत झाल्याने नागरिकांचे हाल होत असून, या गंभीर समस्येकडे महावितरण अजिबात लक्ष देत नसल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेला अंधार आणि वीजपुरवठा खंडित झाल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.